वर्ष : ०५ | अंक: ०५ | मुंबई, मंगळवार २५ डिसेंबर २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

PG 2

सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकल्यास १५ हजारांपर्यंत दंड

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

3 → जीएसटी कपातीचा भुल- भुलय्या !

नववर्षाच्या तोंडावर सामान्यांना दिलासा, ३३ वस्तूंवरील जीएसटी कमी ← 4

# जागावाटप गेलं खड्डयात

## आधी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा



# उद्धव ठाकरे यांचा घणाघात

**पंढरपूर - 'युतीच्या फालतू चर्चेत मला पडायचे नाही. युती करायची की नाही हे जनताच ठरवेल, आम्ही ठरवलंच आहे. आता शेतकरी-कष्टकऱ्यांचं तुफान उठलंय. त्याला शांत करणार नसाल तर तुमच्या मांडीला मांडी लावून बसण्यात काय अर्थ. मला सत्ता नकोय. जागा वाटपात मला स्वारस्य नाही. राम मंदिर झालंच पाहिजे, तुमचं जागा वाटप गेलं खड्डयात,' असा घणाघात करतानाच पिक विम्याचं कंत्राट खासगी कंपनीला दिलं. राफेलमध्ये घोटाळा झालाय. किती पापं करणार? कडुलिंबालाही किड लागलीय. हे पहिल्यांदाच असं घडतंय. करणार काय? हल्ली पहारेकरीही चोऱ्या करायला लागलेत, अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केली.**

### ग्रामीण भागातील शिवसेनेच्या शाखा बनतील शेतकऱ्यांचे आधार केंद्र


पंढरपुरात चंद्रभागेच्या तीरावर आयोजित सभेत उद्धव ठाकरे यांनी हा घणाघात केला. 'युती होणार का या फालतू चर्चेत मी जात नाही. तुमच्या क्लिनचीटशी माझं घेणंदेणं नाही, माझ्या शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, ज्यांनी माझ्या जनतेचं वाकडं केलंय, त्याला अद्दल घडव हेच विठ्ठलाच्या चरणी माझं साकडं आहे,' असं उद्धव ठाकरे म्हणाले. 'आज पंढरपुरात आलोय. उद्या वाराणासीतही जाईन. कुंभकर्णाला जागं करण्यासाठी संपूर्ण देश फिरेन. कुंभकर्ण झोपलेला असला तरी हिंदू झोपलेला नाही. त्यामुळे कुंभकर्णा आता जागा हो, नाही तर पेटलेला हिंदू तुला जागं केल्याशिवाय राहणार नाही,' असा इशारा देतानाच कुंभकर्णाला जागं करण्यासाठीच अयोध्येला गेलो होतो, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

### हिंमत असेल तर शिक्षा करून दाखवा

'शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून आवाज उठवणं गुन्हा असेल तर तो गुन्हा करणारच. न्याय मागणं आणि सरकारला धारेवर धरणं गुन्हा असेल तर हा गुन्हा करणारचं. हिंमत असेल तर मला शिक्षा करून दाखवा,' असं आव्हान देतानाच तुमची मस्ती इथे नाही चालणार. हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे, शिवरायांचा महाराष्ट्र तुमची मस्ती खपवून घेणार नाही, असा घणाघातही त्यांनी केला.

### सत्ताधाऱ्यांच्या ठिकऱ्या उडाल्या

उद्धव यांनी सभेच्या सुरुवातीलाच पाच राज्यातील निकालावरून भाजपवर जोरदार निशाणा साधला. मिझोराम आणि तेलंगणात प्रादेशिक पक्षांनी राष्ट्रीय पक्षांना धूळ चारली. त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे, असं सांगतानाच आम्ही जगज्जेते आहोत असा समज असणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या पाच राज्यातील निकालांनी ठिकऱ्या उडवल्या, अशी टीकाही त्यांनी केली.




# आर. आर. आबांचा वारसदार ठरला; पुढच्या विधानसभेला तासगावमधून लढणार

***सांगली – राज्याचे माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील हे तासगाव विधानसभा मतदारसंघातून २०२४ ची निवडणूक लढवतील, अशी घोषणा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. सांगलीतील एका कार्यक्रमात पाटील बोलत होते.***



राजकारणात थोडसे थांबावे लागते. एवढी विधानसभा सुमनताईंना लढावी लागेल. त्यांना राज्यात उच्चांकी मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन केले. यानंतर पाटील यांनी आबांच्यासारखी रोहितची वक्तृत्वशैली आहे. त्यामुळे पुढची विधानसभा रोहितला मिळणार असल्याचे यावेळी जाहीर केले.

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांचे १६ फेब्रुवारी २०१५ ला निधन झाले. पाटील कर्करोगाने ग्रस्त होते आणि त्यांच्यावर लीलावती रुग्णालयात काही आठवडे उपचार सुरू होते. अनेकांचे जीवन उध्वस्त करणाऱ्या डान्स बारवर बंदीची कारवाई करणा-या पाटील यांची गृहमंत्रीपदाची कारकिर्द चांगलीच गाजली. सांगलीजवळच्या तासगावातून अत्यंत तळातून उपमुख्यमंत्रीपदापर्यंत मजल मारलेल्या पाटील यांची प्रतिमा ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा अशी होती. तब्बल पाचवेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या पाटील यांनी सर्वात जास्त काळ गृहमंत्रीपदही भूषवले होते.

त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुमन पाटील यांना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली होती. त्या मोठ्या मताधिक्याने तासगाव मतदारसंघातून निवडून गेल्या होत्या.

# चुकीच्या दिशेने गाडी चालवल्यास

# ड्रायव्हिंग लायसन्स कायमस्वरुपी रद्द

**अहमदाबाद - रस्त्याच्या चुकीच्या बाजूने (wrong way) गाडी चालवताना दोनदा पकडले गेल्यास आजीवन ड्रायव्हिंगवर बंदी घालण्याचा निर्णय अहमदाबाद वाहतुक पोलिसांनी आणि रिजनल ट्रान्सपोर्ट ऑफिस (Regional Transport Office) यांनी एकत्रितरित्या घेतला आहे.**

RTO चा नवा नियम



चुकीच्या बाजूने गाडी चालवणाऱ्या एखाद्या व्यक्तीवर वाहतुक पोलिसांनी एफआयआर (FIR) दाखल केल्यास आरटीओ (RTO) त्या व्यक्तीचे लायसन्स कायमस्वरुपी रद्द करेल आणि त्या व्यक्तीचे नाव ब्लॅकलिस्टमध्ये दाखल करण्यात येईल.

रस्त्याच्या चुकीच्या बाजूने गाडी चालवताना पहिल्यांदा पकडले गेल्यास वाहतुक पोलिसांकडून त्याची नोंद घेतली जाईल आणि तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीसाठी त्या व्यक्तीचा परवाना रद्द करण्यात येईल. त्याच व्यक्तीने जर पुन्हा हीच चूक केल्यास त्याचा परवाना आरटीओकडून कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.

पूर्वी वाहतुकीच्या नियमांचे पाच वेळा उल्लंघन केल्यास ड्रायव्हिंग लायसन्स रद्द करण्यात येत होते. पण बदललेल्या नियमांनुसार आता वाहतुकीच्या नियमांचे दोन वेळा उल्लंघन केल्यास वाहतुक पोलीस आरटीओला लायसन्स रद्द करण्याची शिफारस करु शकतात, असे डीसीपी (ट्रॅफिक) संजय खरात यांनी टाईम्स ऑफ इंडियाशी बोलताना सांगितले. नवीन नियम लागू झाल्यानंतर वाहतूक पोलिसांनी आतापर्यंत सात ड्रायव्हींग लायसन्स रद्द केले आहेत.

# मुंबईतील 'बेस्ट'चे कर्मचारी ८ जानेवारीपासून संपावर

**मुंबईः बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी बेस्टचे कर्मचारी ८ जानेवारीपासून संपावर जाणार आहेत. संपावर जायचे की नाही, याबाबत निर्णय घेण्यासाठी गुरुवारी मतदान घेण्यात आले होते. याची मतमोजणी शुक्रवारी झाली. यामध्ये ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी संपाच्या बाजूने मतदान केले आहे.**




संपाविषयी कर्मचाऱ्यांची नेमकी मते जाणून घेण्यासाठी कृती समितीच्यावतीने गुरुवारी बेस्टच्या सर्व आगारांमध्ये मतदान घेण्यात आले होते. या मतदानाला बेस्टच्या कर्मचाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे समजते. मतदानाच्यावेळी एकूण १५ हजार २११ कर्मचाऱ्यांनी मतदान केले. त्यातील ९५ टक्के म्हणजेच, १४ हजार ४६१ मते संपाच्या निर्णयाच्या बाजूने पडली. त्यामुळे आता ८ जानेवारीपासून बेस्टचे कर्मचारी संपावर जाणार आहेत.

दरम्यान, बेस्ट आणि मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प एकाच वेळी जाहीर करावा, २०१६-१७ आणि २०१७-१८मधील बोनससंबंधी तातडीने तोडगा काढावा आदी प्रमुख मागण्या कर्मचाऱ्यांच्या आहेत.

# सत्तांतर करण्यासाठी देशवासीयांनी, तरुणांनी पुढाकार घ्या

**मुंबई –** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खोटारडे असून, २०१४ च्या ३१ टक्के जनतेची मते घेऊन आणि निवडणुकीत देशातील जनतेला खोटी आश्वासने देऊन सत्तेवर आलेल्या मोदींचा खरा चेहरा देशातील जनतेला आता दिसला आहे. त्यामुळे आता देशाची धोक्यात आलेली लोकशाही व ढासाळलेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी सत्तांतर होण्यासाठी देशवासीयांनी आणि विशेष करून तरुणांनी आता पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन कम्युनिस्ट नेते आणि जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष कन्हैयाकुमार यांनी शनिवारी वांद्रे येथे केले.

वांद्रे पश्चिम येथील फादर अँग्रल सभागृहात ऑल इंडिया प्रोफेशनल काँग्रेस (एआयपीसी) आयोजित 'सत्यमेव जयते फ्रॉम बिहार टू तिहार' या पुस्तकातील त्यांच्या अनुभवावर आणि सध्याच्या देशातील राजकीय परिस्थितीवर कन्हैयाकुमार यांच्याशी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते संजय झा यांनी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. कन्हैयाकुमार म्हणाले, सत्तेवरून पायउतार झाल्यावर त्यांचे अनेक घोटाळे बाहेर येतील. मोदींच्या दावणीला पेड न्यूज चॅनल बांधली गेली असून मोदी आपले मुद्दे या माध्यमातून जनतेवर बिंबवत आहेत. त्यामुळे फेक न्यूजचा धोका त्यांनी ओळखला पाहिजे.



जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी मंदिर व मशीद मुद्दे उकरून काढणे, जातीयवादाला खतपाणी घालणे, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना दुय्यम स्थान देऊन त्यांची हत्या करणारे नथुराम गोडसे तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा जयजयकार करण्याचे काम मोदी सरकार आणि त्यांची री ओढणारे त्यांचे अनुयायी करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. दोन कोटी लोकांना रोजगार देऊ, पंधरा लाख रुपये आपल्या खात्यात टाकू, अशी मोदींची आश्वासने कुठे गेली, नोटा बंदी करून किती काळा पैसा बाहेर आला, असा सवाल त्यांनी केला.

# साने गुरुजी विद्यामंदिर सांताक्रूझ येथे शिक्षक कृतज्ञता दिन साजरा



जवळ जवळ एक शतक पूर्ण करण्याच्या उबरठयांवर उभे असलेले साने गुरुजी विदयामंदिर हे सकूंल यामध्ये आतापर्यंत लाखो विदयाथ्यानी शिक्षण घेतले व विविध क्षेत्रात उच्च पदावर जाऊन आपला नित्य क्रंम चालवला पण याच विदयार्थ्यांमध्ये असलेले शाळेबद्दल प्रेम खुप अफाट आहे. माजी विदयार्थी यांनी एक गट तयार करुन आतापर्यंत जवळजवळ ८ वर्षे झाली हा शिक्षक कृतज्ञता दिन स्वः खर्चाने साजरा करतात. या धकाधकीच्या जिवनात आपला अमूल्य वेळ देऊन वेळोवेळी शाळेला भेट देणे, शिक्षकांना भेटणे त्यांचा सन्मान करणे असे अनेक कार्यक्रम माजी विदयार्थी चा एक समुह करतो. यामध्ये त्याच शाळेत शिकलेल्या विदयार्थीनी यांचीही संख्या मोठया प्रमाणात आहे. यावेळी सत्कारमुर्ती श्रीमती सुमन शानबाग (पै बाई) श्रीमती माधवी भगत (सुरेखा बाई) यांचा मोठया थाटामध्ये सत्कार करण्यांत आला, त्याचप्रमाणे त्याच शाळेत शिक्षण पूर्ण केलेल्या आश्रय ट्रस्टचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांनीही आश्रय ट्रस्टच्या वतीने माजी शिक्षकांचा मानचिन्हं व शाल देऊन सत्कार केला . या सत्कारामध्ये शाळेसाठी संपूर्ण जिवनभर सामाजिक ,

उर्वरित पृष्ठ 4 वर



# सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकल्यास १५ हजारांपर्यंत दंड



**मुंबई- शहरातील ज्या गृहनिर्माण सोसायट्या किंवा कार्यालयांत १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो, त्यांनाच या कचऱ्याची विल्हेवाट लावणे राज्य सरकारने बंधनकारक केले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्यांनीही आता १५ हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाणार आहे. शहरात निर्माण होणाऱ्या हजारो टन घनकचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असतानाच सरकारसाठी हा प्रश्न डोकेदुखी ठरली होती. कचऱ्याचा हा प्रश्न निकाली काढण्यासाठी राज्य सरकारने मात्र कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे.**

केवळ नगरपालिका, महापालिकाच नव्हे तर सरकारसाठीही डोकेदुखी ठरलेल्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र सरकारने घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ लागू केला असला तरी अंमलबजावणीसाठी कोणत्याच महापालिकेने उपविधी (रुल) तयार न केल्याने आजवर हा कायदा कागदावरच राहिला होता. या नियमाच्या आधारे उपविधी तयार करण्यासाठी महापालिकांना एक वर्षांची मुदत देण्यात आली होती. मात्र, गेल्या दोन वर्षांत एकाही महापालिकेने असे उपविधि तयार केल नाहीत. अखेर राज्य सरकारने स्वत:च आपल्या विशेषाधिकारात घनकचऱ्याबाबत सर्व महापालिकांसाठी एकच उपविधी लागू करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतची अधिसूचनाही रविवारी जारी केली. त्यानुसार १०० किलोपेक्षा कमी कचरा निर्माण होणाऱ्या गृहनिर्माण संस्थासाठी अ आणि ब वर्ग महापालिका क्षेत्रात दर महिन्याला ६० रूपये, तर क आणि ड वर्ग महापालिका क्षेत्रात ५० रूपये शुल्क आकारण्यात येणार आहे. महापालिकांच्या या वर्गवारीनुसार दुकानांसाठी अनुक्रमे ९० आणि ७५ रूपये, उपहारगृह, हॉटेल, गोदाम, शोरूमसाठी अनुक्रमे १२० आणि १०० रूपये आकारण्यात येणार आहेत. तर ५० खाटांपेक्षा कमी रूग्णालयांसाठी १२० आणि १००, तर ५० पेक्षा अधिक खाटा असलेल्या रुग्णालयांसाठी १८० आणि १५० रुपये शुक्ल आकारण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये, धार्मिक संस्था, सरकारी- निमसरकारी कार्यालये यांच्यासाठी अ- ब वर्ग महापालिकांमध्ये ९० रूपये तर क आणि ड वर्ग महापालिकांमध्ये ७५ रूपये महिन्याला आकारण्यात येणार आहेत. विवाह कार्यालयांसाठी हाच दर ३०० आणि २५० रूपये असून फेरीवाल्यांसाठी १८० आणि १५० रूपये शुल्क असेल.

रस्त्यावर कचरा फेकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून विद्रुपीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांनाही आता मोठा दंड आकारण्यात येणार आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा न करणाऱ्या व्यक्तीस पहिल्या गुन्ह्यासाठी अ आणि ब वर्ग महापालिकेमध्य अनुक्रमे ६० आणि ५० रूपये, दुसऱ्या गुन्ह्यासाठी १२० आणि १०० रूपये, तर तिसऱ्या वेळी १८० आणि १५० रूपये दंड भरावा लागणार आहे.

# वाहनतळ व्यवस्थेसाठी पालिकेची सोसायट्यांना साद!

**मुंबई-** वाहन संख्येत झालेली प्रचंड वाढ आणि मर्यादित जागा लक्षात घेता मुंबईत मोठ्या संख्येने सार्वजनिक वाहनतळ उपलब्ध करण्यात पालिका अपयशी ठरली आहे. त्यामुळे आता दिवसभर मोकळी राहणारी सोसायट्यांच्या आवारातील वाहनतळ मुंबईकरांसाठी खुले करण्याबाबत पालिकेने चाचपणी सुरू केली आहे. त्यासाठी पालिकेने सोसायट्यांना साद घालण्यास सुरुवात केली आहे.



गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईमधील वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. आसपासच्या शहरांमधील नागरिक कामानिमित्त आपले वाहन घेऊन मुंबईत येतात. मुंबईकरांना, तसेच मुंबईबाहेरून येणाऱ्यांना आपली वाहने उभी करता यावी यासाठी पालिकेने ठिकठिकाणी सार्वजनिक वाहनतळ उपलब्ध केले. मात्र वाहनांची संख्या लक्षात घेता वाहनतळ अपुरे पडू लागले आहेत. मुंबईतील अपुऱ्या जागेमुळे वाहनतळांचे नियोजन करण्यात पालिका सपशेल अपयशी ठरली आहे. परिणामी, मुंबईत अनेक ठिकाणी वाहने अस्ताव्यस्त उभी करण्यात येत असून त्याचा पादचारी आणि वाहतुकीला प्रचंड अडथळा निर्माण होत आहे. जागेअभावी शहरात सार्वजनिक वाहनतळ उभे करता येत नसल्यामुळे पालिकेने आता सोसायट्यांच्या आवारातील जागा सार्वजनिक वाहतळांसाठी मिळू शकते का याची चाचपणी सुरू केली आहे. सोसायट्यांच्या आवारात वाहने उभी करण्यासाठी व्यवस्था असते. या जागेत इमारतीमधील रहिवासी आपली वाहने उभी करतात. मात्र रहिवासी दिवसा आपली वाहने घेऊन कामानिमित्त अन्यत्र जातात. त्या वेळी सोसायट्यांच्या आवारातील ही जागा मोकळीच असते. सोसायट्यांमधील ही जागा दिवसा मुंबईकरांना आपली वाहने उभी करण्यासाठी उपलब्ध करता येईल का याबाबत पालिकेने सर्वेक्षण सुरू केले आहे. ही जागा उपलब्ध झाल्यास त्या परिसरात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांना आपले वाहन तेथे उभे करता येऊ शकले, असे पालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

ॲपवर सार्वजनिक वाहनतळांची माहिती : सार्वजनिक वाहनतळांचा प्रश्न सोडविण्यासाठी पालिकेने वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना केली असून सार्वजनिक वाहनतळांसाठी स्वतंत्र ॲप बनविण्याच्या हालचाली प्राधिकरणाने सुरू केल्या आहेत.



# देशांतर्गत हवाई प्रवाशांच्या संख्येत सरासरी १९ टक्के वाढ झाल्याचे उघड

**मुंबई-** देशातील हवाई प्रवाशांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून जानेवारी ते नोव्हेंबर २०१८ या कालावधीत गतवर्षीच्या तुलनेत देशांतर्गत प्रवाशांच्या संख्येत १९.२१ टक्के वाढ झाली आहे. हवाई प्रवासावेळी विविध सुविधा न मिळाल्याबाबत ७८६ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी ७०० तक्रारी सोडवण्यात आल्या असून ८६ तक्रारी प्रलंबित आहेत. १२ कोटी ६२ लाख ८३ हजार प्रवाशांनी या कालावधीत देशांतर्गत प्रवास केला आहे. २०१७ मध्ये जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत १० कोटी ५९ लाख प्रवाशांनी प्रवास केला होता. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए)ने अहवालामध्ये ही माहिती दिली आहे. नोव्हेंबरमध्ये एअर इंडियाच्या प्रवासी संख्येत किंचित घट होऊन ही संख्या ७८.६ टक्के झाले. ऑक्टोबर महिन्यात ही संख्या ७८.८ टक्के होती. इतर सर्व खासगी विमान सेवांच्या भारमानात किरकोळ वाढ झाली आहे. नोव्हेंबर महिन्यातील एकूण प्रवाशांपैकी एअर इंडियाचा हिस्सा १२.२ टक्के आहे तर खासगी विमान वाहतूक कंपन्यांचा हिस्सा ८७.८ टक्के आहे. एअर इंडियाद्वारे १४ लाख १८ हजार प्रवाशांनी तर खासगी विमान कंपन्यांद्वारे १ कोटी २ लाख २७ हजार प्रवाशांनी प्रवास केला. जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत एअर इंडियातर्फे १ कोटी ६० लाख ४४ हजार, तर खासगी कंपन्यांद्वारे ११ कोटी २ लाख ३९ हजार प्रवाशांनी प्रवास केला. जानेवारी ते नोव्हेंबर दरम्यान एअर इंडियाचे भारमान सर्वात जास्त फेब्रुवारी महिन्यात ८६.७ टक्के होते तर नोव्हेंबरमध्ये यंदाचे सर्वात कमी ७८.६ टक्के भारमान नोंदवण्यात आले.

# चिल्लरच्या रूपात मिळतोय 'बेस्ट' पगार

**मुंबई-** सुट्ट्या पैशांवरून कंडक्टर आणि प्रवाशांमध्ये नेहमीच खटके उडत असतात. मात्र हेच सुट्टे पैसे पगार स्वरूपात बेस्ट कर्मचाऱ्यांना मिळू लागले आहेत. आर्थिक अडचणीत असलेला बेस्ट उपक्रम कामगारांचा पगार दररोज बस भाड्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या चिल्लरद्वारे भागवित आहे. बेस्ट उपक्रम तुटीत असल्याने कामगारांचा दर महिन्याचा पगार देण्यातही अडचण येत आहे. पैशांची तजवीज झाल्यानंतरच कामगारांना पगार देण्यात येत होता. त्यामुळे कामगारांचा पगार दर महिन्याच्या २० तारखेनंतर होऊ लागला. परिणामी, कामगारांमध्ये रोष पसरून आंदोलनाचा इशाराही कामगारांनी अनेकवेळा दिला. अखेर प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पगार देण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. हा पगार नाण्यांच्या स्वरूपात मिळत आहे. नोव्हेंबरमध्ये सुमारे ३९ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना पगाराचा भाग म्हणून प्रत्येकी १० रुपयांची ४० नाणी देण्यात आली. अशा प्रकारे पगाराचा हिस्सा म्हणून एक कोटी चार लाख रुपयांचे वाटप नाण्यांच्या स्वरूपात झाले. त्यामुळे प्रत्येक महिन्याला चिल्लर मोजण्याची वेळ बेस्टच्या कामगारांवर आली आहे.

बेस्ट उपक्रमात परिवहन सेवेतून जमा होणाऱ्या सुट्ट्या पैशांचा विनियोग वेगवेगळ्या पद्धतीने केला जातो. त्यानंतरही मोठ्या प्रमाणात रक्कम शिल्लक राहते. काही बँकांमध्ये चिल्लर स्वीकारली जात नाही. त्यामागेही सुट्टे पैसे मोजणार कोण, ताळमेळ आदी अनेक समस्या असतात. यावर उपाय म्हणून बेस्ट प्रशासनाने सुट्टे पैसे कर्मचाऱ्यांना देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. दरमहा - ७० लाख रुपये मूल्यांची १० रुपयांची नाणी जमा होतात. दहा हजार कंडक्टरांना दररोज प्रत्येकी १०० रुपयांची नाणी दिली जातात. त्यामध्ये १ रुपये, २ रुपये, ५ रुपये, १० रुपयांच्या नाण्यांचा समावेश असतो.



# अनुदानित शाळांना बंद पालिका शाळांची आस

**मुंबई-** मुंबईतील मराठी माध्यमाच्या खासगी अनुदानित शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या असून जागांचे गगनाला भिडलेले भाव आणि लठ्ठ भाड्यामुळे त्यांना नव्या इमारतीत वर्ग घेणेही शक्य नाही. त्यामुळे महापालिकेच्या बंद पडलेल्या शाळांच्या इमारतीत भाड्याने जागा मिळावी यासाठी शाळा व्यवस्थापकांनी प्रयत्न सुरू केले आहेत. अशा १४ शाळांनी पालिकेकडे जागेची मागणी केली आहे. परंतु, पालिकेच्या बंद शाळांतील जागा संस्थांना न देण्याचे प्रशासनाचे धोरण अडथळा ठरत आहे. मुंबईतील मराठी माध्यमाच्या सुमारे १४ खासगी अनुदानित शाळांच्या इमारती धोकादायक झाल्या असून या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मुंबईमध्ये जागांचे भाव गगनाला भिडले असून नवी जागा घेऊन शाळा चालविणे या अनुदानित शाळांसाठी अशक्य झाले आहे. तसेच मुंबईतील जागांचे भाडेही परवडेनासे झाले आहे. शाळेसाठी लागणारी मोठी जागा आणि त्याचे भाडे संस्थांना झेपणारे नाही. तसेच शाळेच्या आसपासच्या परिसरात भाड्याने मोठी जागा उपलब्ध होणेही अवघड आहे. अशा स्थितीत काही शाळांनी आसपासच्या परिसरातील पटसंख्या घसरल्यामुळे बंद पडलेल्या पालिकेच्या शाळांतील रिकाम्या वर्गखोल्या तात्पुरत्या भाड्याने मिळाव्यात यासाठी पालिका दरबारी प्रयत्न सुरू केले आहेत. किमान आपल्या शाळेच्या इमारतीची दुरुस्ती होईपर्यंत पालिकेने जागा भाड्याने द्यावी, अशी विनंती अनुदानित शाळांच्या व्यवस्थापनाने केली आहे.



# क्राइम पेट्रोल पाहून अल्पवयीन मुलाने केली १० वर्षाच्या मुलाची हत्या

क्राइम पेट्रोल ही मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने दहा वर्षांच्या मुलाच्या हत्या केल्याचा प्रकार मुंबईतील साकीनाका भागात घडला आहे. एवढेच नाही तर या अल्पवयीन मुलाने १० वर्षांच्या मुलाचा मृतदेह सुटकेसमध्ये भरला आणि ती सुटकेस नाल्यात फेकून दिली. दुपारी साडेतीनच्या सुमारास या सगळ्या प्रकाराचा उलगडा झाल्यानंतर पोलिसांनी या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केल्यावर आपणच या मुलाचा खून केल्याची कबुली या मुलाने दिली. अल्पवयीन मुलाने आपण दहा वर्षांच्या मुलाच्या वडिलांकडे पाच लाखांची खंडणी मागितल्याचीही कबुली दिली. साकीनाका भागात असलेला एक दहा वर्षांचा मुलगा २० डिसेंबरला शिकवणीला गेला आणि परतलाच नाही. ज्यानंतर त्याच्या पालकांनी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मोबाइल लोकेशन आणि कॉल रेकॉर्डवरून तपास केला, ज्यानंतर या प्रकरणाचा छडा लागला. दहा वर्षांच्या मुलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच या मुलाचा खून कसा करण्यात आला ते स्पष्ट होणार आहे असे पोलिसांनी सांगितले.

# गोरेगावमधील मोतीलालनगरचा पुनर्विकास अखेर लागला मार्गी

**मुंबई-** गोरेगाव पश्चिमेतील मोतीलालनगरचा पुनर्विकास अखेर मार्गी लागला आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाने मोतीलालनगर पुनर्विकासासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केली असून, फेब्रुवारीत बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाचे अध्यक्ष उदय सामंत यांनी दिली. या पुनर्विकासातून म्हाडाला तब्बल १८ हजार अतिरिक्त घरे उपलब्ध होतील. ही घरे लॉटरीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना वितरित केली जातील. यामुळे मुंबईत मोठ्या प्रमाणावर परवडणाऱ्या दरात म्हाडा घरे उपलब्ध करून देणार आहे.

म्हाडा मोतीलालनगरमधील १४२ एकर जागेचा पुनर्विकास करणार आहे. मोतीलालनगरमधील ३,७०० रहिवाशांना पुनर्विकासांतर्गत टॉवरमध्ये घरे मिळतील. या पुनर्विकासासाठी म्हाडाला ५ कोटींचा खर्च येणार आहे. उर्वरित जागेवर ज्या इमारती म्हाडाकडून उभारण्यात येतील, त्यात १८ हजार घरे म्हाडाला विक्रीसाठी उपलब्ध होतील. या घरांची लॉटरी काढून घरांची विक्री होईल. यातून म्हाडाला अंदाजे २५ हजार कोटींचा फायदा होईल, असे उदय सामंत यांनी सांगितले. गेल्या ५ वर्षांपासून मोतीलालनगरचा पुनर्विकास मार्गी लागत नव्हता. यासाठी मोतीलालनगरमधील रहिवासी मोतीलालनगर विकास समितीच्या माध्यमातून म्हाडा आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करत होते. रहिवाशांनी अतिरिक्त बांधकाम केल्यासंबंधीच्या एका जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने हे अतिरिक्त बांधकाम अनधिकृत ठरविले आहे.



## गोरेगावमध्ये निर्माणाधीन दुमजली इमारत कोसळली, तिघांचा मृत्यू; ७ जखमी



मुंबईतील गोरेगाव येथे बांधकाम सुरू असलेली दुमजली इमारत कोसळल्याचं वृत्त आहे. यामध्ये ढिगाऱ्याखाली अडकल्याने तिघांचा मृत्यू झाला आहे तर सात जण जखमी झालेत. गोरेगाव पश्चिमेकडील मोतीलाल नगरमध्ये म्हाडा वसाहतीत सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. जखमींना तात्काळ सिद्धार्थ रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान एकाचा मृत्यू झाला. मृतांपैकी एकाचं नाव रामू असं असून तो २२ वर्षांचा होता, तो बांधकाम मजूर असल्याचं सांगितलं जातंय. घटनास्थळी एनडीआरएफचं पथक दाखल झालं असून बचावकार्य सुरू आहे. तर इतर सात जण जखमी आहेत. मंगल बनसा(३५ वर्षं), मुन्ना शेख(३० वर्षं), शिनू (३५ वर्षं), हरी वडार (३ वर्षं), शंकर पटेल(२१ वर्षं), सरोजा वडार(२४ वर्षं), रमेश निशाद (३२ वर्षं) जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर सिद्धार्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती स्थिर असल्याचं समजतंय.



# बॅनरबाजीला चाप लावण्याच्या मार्गात राजकीय अडसर

**मुंबई –** मुंबईला होर्डिंगमुक्त करण्यासाठी पालिका प्रशासनाने तयार केलेल्या धोरणामुळे राजकीय बॅनर्सवरही निर्बंध येणार आहेत. मात्र आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या काळात ही बंदी मारक ठरू शकते. त्यामुळे आपल्या कामाचा गाजावाजा करून मतदारांना होर्डिंग्जच्या माध्यमातून खूश करण्याची संधी सोडण्यास राजकीय पक्ष सहजासहजी तयार नाहीत. यामुळे या धोरणाच्या मार्गात राजकीय खोडा निर्माण झाला आहे.

मुंबईत सुरू असलेल्या बॅनरबाजीत शहराचा चेहरा विद्रूप होत आहे. अनेकदा महापालिकेची परवानगी न घेताच मुंबईतील मोक्याच्या ठिकाणी बॅनर्स झळकतात. सण, उत्सव, समारंभ, शुभेच्छा अशा जाहिरातींनी मुंबई झाकोळून जाते. याची गंभीर दखल घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने बॅनरबाजीला चाप लावण्यासाठी धोरणात सुधारणा करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेने २०१६ मध्ये राजकीय जाहिरातींवर बंदी आणण्याची शिफारस केली आहे.

मात्र बराच काळ हे धोरण महापालिकेच्या विविध समित्यांच्या पटलावर रखडले आहे. विकासकामांची घोषणा करण्यासाठी बॅनर्स हे राजकीय पक्षांकरिता प्रभावी माध्यम ठरले आहे. आपल्या कामांची माहिती देण्याव्यतिरिक्त श्रेयावरून युद्ध, आरोप-प्रत्यारोपही बॅनरबाजीत रंगत आहेत. नुकत्याच झालेल्या पालिकेच्या स्थायी समिती बैठकीतही या धोरणाचा प्रस्ताव चर्चेविना पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे आगामी निवडणुकीच्या काळातही बॅनरबाजीचे युद्ध पेटण्याचे चिन्ह आहे.

# मोनोची धुरा तीनच गाड्यांवर

एकेकाळी १० गाड्यांचा ताफा असलेल्या मोनोच्या बहुतांश गाड्या नादुरुस्त झाल्याने चालविण्यायोग्य असलेल्या तीन गाड्यांच्या बळावर चेंबूर ते वडाळा या दरम्यानचा गाडा 'मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणा'ला (एमएमआरडीए) हाकावा लागत आहे. गेल्या आठवड्यात 'एमएमआरडीए'कडून मोनो प्रकल्प ताब्यात घेण्यात आला. त्यापूर्वीच सेवेत असलेल्या चार गाड्यांपैकी एक गाडी बिघडली. त्यामुळे बिघडलेल्या गाड्यांची संख्या सातवर गेली. त्यापैकी दोन गाड्या भंगारात काढाव्या लागणार आहेत. अर्थात गाड्या कमी असल्या तरी गेल्या आठवड्याभरात मोनोच्या १३० फेऱ्यांचे ध्येय पूर्ण करून सेवेत वक्तशीरपणा आणल्याचा दावा 'एमएमआरडीए'ने केला आहे.

ढिसाळ व्यवस्थापन आणि प्रकल्पाला आर्थिक डबाघाईच्या परिस्थितीत आणल्याचे कारण देत 'एमएमआरडीए'ने १४ डिसेंबर रोजी स्कोमी कंपनीला मोनो प्रकल्पातून हद्दपार केले. त्यानंतर 'प्रकल्प अंमलबजावणी युनिट' (पीआययू) स्थापन करून प्राधिकरणाने मोनोच्या संचलनाची जबाबदारी आपल्या खांद्यांवर घेतली. १० महिन्यांनंतर सप्टेंबर महिन्यात चेंबूर ते वडाळा या पहिल्या टप्प्यावर चार गाड्यांच्या आधारे मोनो सेवा पुन्हा कार्यान्वित करण्यात आली होती. मात्र 'एमएमआरडीए'ने गेल्या आठवड्यात प्रकल्प ताब्यात घेतल्यापासून केवळ तीन गाड्यांच्या आधारे सेवा सुरू आहे. प्रकल्प ताब्यात घेण्यापूर्वीच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात चारपैकी एका गाडीत तांत्रिक बिघाड झाल्याने स्कोमीने त्या गाडीला डेपोत धाडल्याची माहिती मोनो प्रकल्पातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. त्यामुळे डेपोत नादुरुस्त असलेल्या गाड्यांची संख्या सात झाली असून त्यापैकी दोन गाड्या भंगारात काढाव्या लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. दोनपैकी एक गाडी म्हैसूर स्थानकात लागलेल्या आगीमुळे पूर्णपणे बिघडली आहे, तर दुसरी गाडी तांत्रिक कारणास्तव दुरुस्त करण्याजोगी राहिलेली नाही. त्यामुळे या गाड्यांची विमा रक्कम मिळवून त्यांना भंगारात काढण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे तो अधिकारी म्हणाला.



केवळ तीन गाड्यांच्या बळावर गेल्या आठवड्याभरात प्रवासी संख्या आणि उत्पन्न वाढविल्याचा दावा 'एमएमआरडीए'ने केला आहे.

## संपादकीय...

# जीएसटी कपातीचा भुल- भुलय्या!



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

२०१९ च्या लोकसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदींना अखेर तब्बल ९९ टक्के वस्तूंवरचा जीएसटी १८ टक्के व त्यापेक्षा कमी कराच्या कक्षेत आणण्याची घोषणा करावी लागली. या वस्तू सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक बाबी आहेत. या कपातीने दरमहा खर्चाचे प्रमाण कमी होईल असे मोदींचे म्हणणे आहे. वास्तविक ही घोषणा ते सध्या सुरू असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात करू शकले असते, पण सभागृहातला गोंधळ शिंगावर न घेता त्यांनी एका टीव्ही चॅनेलच्या कार्यक्रमात ही घोषणा करण्याची संधी साधली. सर्व राज्यांची जीएसटी परिषद होत असून त्यात जीएसटी दर कमी करावेत यावरून राज्य व केंद्रात गदारोळ माजण्याची शक्यता वर्तवली जात होती. भाजपच्या हातातून नुकतीच तीन राज्ये गेल्याने काँग्रेस व अन्य भाजपेतर राज्यांमध्ये जो आत्मविश्वास निर्माण झाला होता, त्याचा पारा खाली आणण्यासाठी मोदींनी ही राजकीय चाल खेळली. काँग्रेसने जीएसटी विधेयकाचा आराखडा तयार होईपर्यंत तसेच नंतर तो संसदेत मंजूर झाल्यानंतर सातत्याने जीवनावश्यक व ग्राहकोपयोगी वस्तूंवरील जीएसटी १८ टक्के वा त्या खाली असावा म्हणून संसदेपासून रस्त्यावर, निवडणूक प्रचारात रण माजवले होते. काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांनी गुजरात, कर्नाटक विधानसभा निवडणुकांमध्ये हा विषय घरोघरी, तळागळातल्या मतदारांपर्यंत नेला आणि त्याने व्यापारी, लघुउद्योजकांमध्ये सरकारविरोधात वातावरण निर्माण झाले होते. मात्र, या घटकांत खदखदणाऱ्या असंतोषाकडे लक्ष न देता राहुल गांधींची हेटाळणी करत जेटली-मोदींनी काँग्रेसच्या दबावाला कोणत्याही परिस्थितीत बळी पडायचे नाहीच या हेकेखोर प्रवृत्तीतून जीएसटी कमी करण्यात चालढकल केली. मागील वर्षी मात्र गुजरातमधील विधानसभा निवडणुकांत सुरतच्या सोने-चांदी व्यापाऱ्यांनी या करावरून प्रचंड प्रमाणात रोष व्यक्त केला. सुरतमध्ये हजारो व्यापाऱ्यांचे मोर्चे निघाले आणि तेथील जनमत सरकारविरोधात जात असल्याचे पाहून केंद्र सरकारने एका रात्रीत गुजराती पदार्थ खाकरा, सोने-चांदी यांच्यावरील जीएसटी कमी करून आपली अब्रू वाचवली. ही तात्पुरती मलमपट्टी होती. आता मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या तीन राज्यातला मध्यमवर्ग, व्यापारी, उद्योजक व शेतकरी भाजपच्या मागे उभा न राहिल्याने मोदींना जीएसटी कमी करण्यावाचून तरणोपाय राहिला नव्हता हे स्पष्ट आहे.




जीएसटी कपातीचा निर्णय घेण्यामागे काही आर्थिक कारणेही कारणीभूत आहेत. एक म्हणजे गेल्या जुलै महिन्यापर्यंत सुमारे सहा हजार कोटी रु.ची तूट सरकारला सोसावी लागली. हा सरकारला धक्का होता. कारण नोटबंदीचा निर्णय व त्यानंतर जीएसटीची घाईघाईतील अंमलबजावणी यामुळे सरकारवर सर्वच बाजूंनी टीका होत असताना सरकार नोटबंदीच्या वृथा यशावर ठाम होते. नोटबंदीच्या परिणामांची झळ असंघटित क्षेत्राला प्रचंड बसली तरीही बँकेत किती पैसा जमा झाला, करदात्यांची संख्या किती वाढली याचा प्रचार सरकार करत बसले आणि तेच गळ्याशी आले. आज नोटबंदीवर आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झालेले बहुतेक सर्वच अहवाल नोटबंदी हा निर्णय मूर्खपणाचा व अर्थव्यवस्थेला खड्ड्यात घालणारा होता हे सांगणारे आहेत. तसे अपयश जीएसटीच्या अंमलबजावणीवरूनही सरकारला आले. अनेक अर्थतज्ज्ञांनी, व्यापारी-उद्योजक संघटनांनी जीएसटीतील स्लॅबवरून प्रतिकूल मत व्यक्त केले होते पण सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. सरकार जीएसटीची अमलबजावणी व त्याचे होणारे संभाव्य परिणाम याकडे लक्ष देत बसले. पाश्चात्त्य देशांमध्ये जीएसटी लागू झाल्यानंतर तेथे महागाई वाढली असल्याचे केंद्र सरकारच्या निदर्शनास आले होते. तसे चित्र भारतामध्ये दिसले नाही. जीएसटीपेक्षा आंतरराष्ट्रीय तेलबाजारात पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने देशभर महागाईचा डोंब उसळला आणि व्यापारी, उत्पादकांचे बोट जीएसटीतील चढ्या दरांकडे केले. सामान्य माणूस, सर्वच विरोधी पक्ष पेट्रोल-डिझेलला जीएसटीच्या कक्षेत आणा असा आग्रह धरू लागला. साहजिकच जीएसटी परिषदेला गेल्या वर्षभरात अनेक वस्तूंवरील करदरात कपात करावी लागली. त्यामुळे महागाईचा दर स्थिर राहिला पण आपली अर्थव्यवस्था पेट्रोल-डिझेलवर अवलंबून असल्याने महागाईची टांगती तलवार तशी कायमच राहिली. आता सरकारपुढे जीएसटी कपातीतून महसूलात वाढ करणे आणि जीएसटी नोंदणीकृत व्यावसायिकांची संख्या वाढवणे हे खरे आव्हान आहे. सरकारने मंदावलेल्या गृहबांधणी उद्योगात नवचैतन्य आणण्यासाठी सीमेंटवरील जीएसटीमध्ये कपातीचे सूतोवाच केले. त्यामुळे घरांच्या किमती कमी होतील असे नाही. दैनंदिन गरजेच्या वस्तूंवरील जीएसटी कपातीकडे यावेळीही दुर्लक्ष करण्यात आले त्यामुळे सामान्यांसाठी हा भुलय्याच ठरेल. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार जीएसटी कपातीच्या माध्यमातून मतदारांची बचत केल्याचा दावा करेलही; परंतु या निर्णयामुळे अर्थव्यवस्था सुदृढ होईल याची खात्री देता नाही.

# देशाला प्रगतीकडे नेणारा अजेंडा हवा!

***लोकशाहीचा महायज्ञ अर्थात लोकसभा निवडणूक आता उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. या महायज्ञात सामान्य नागरिक म्हणजे भरजत्रेत उभ्या असलेल्या बघ्यासारखा. जत्रेत तगड्या पक्षांचे भले मोठे तंबू लागतात. दुकाने थाटली जातात. पैसा नसलेले रस्त्यावरच बसतात. आपल्यासारखे लोक या मोठ्या दुकानांचे शामियाने पाहूनच थक्क होतात. आपण आत प्रवेश करू शकत नाही. कारण आपल्याकडे तेवढे पैसे नाहीत. हे पक्ष हवे तेव्हा कुणालाही आत घेतात. अगदी कालपर्यंत देशाचा शत्रू समजल्या जाणाऱ्यांना आज जवळ केले जाते.***



तुम्ही-आम्ही फक्त घरात बसून गप्पा ठोकू शकतो. कुणीही ऐकणारे नसते. आपल्या सुख-दु:खांचे विषय सोडून राजकीय पक्ष इतर प्रश्नांचेच ढोल बडवतात. आपण मात्र वेदना विसरून त्यांच्या तालावर ठेका धरतो. तर कधी कानावर हात ठेवतो. जत्रेत फिरून आल्यावर कोणते दुकान सर्वात चांगले, असा प्रश्न विचारला असता आपण कोणत्याही एका मोठ्या दुकानाकडे बोट दाखवून मोकळे होतो. त्याच दुकानदाराचा विजय होतो. विजयी टाळ्यांच्या गजरात आपल्याला त्या वेळी आपणच राजे असल्याचे वाटते. दुसऱ्या दिवशी आयुष्याचे पुन्हा तेच रडगाणे सुरू होते. एकूण काय तर, पैशावरच सत्ता उभी राहते आणि सत्तेतून पुन्हा पैसा!

हे चक्र बदलता येणार नाही का? येत्या निवडणुकीत देशातील सामान्य नागरिक थेट हस्तक्षेप करूच शकणार नाही का? पाच वर्षांतून एकदा बदण दाबण्याशिवाय यंदाच्या निवडणुकीत आपण दुसरी काही भूमिका निभावू शकणार नाही का? निवडणुकीचे मुद्दे, उमेदवार आणि निकाल ठरवण्यात आपण प्रभावी भूमिका पार पाडू शकणार नाही का?

आगामी लोकसभा निवडणूक सामान्य नसेल. ही निवडणूक पुढील अनेक दशकांसाठी देशाचे भविष्य लिहिणारी ठरेल. पण निवडणुकीच्या जत्रेत लागलेल्या दुकानांमध्ये देशातील गंभीर प्रश्नांची पुसटशी सावलीही दिसत नाही. निवडणुका तर आल्या, पण मुख्य प्रवाहात निवडून देण्यासारखे काहीच नाही. जनतेने एवढ्या आशेने ज्यांच्या हाती सत्ता दिली होती, तेच निराश करू लागलेत. विरोधी पक्षांची जबाबदारी दिली, त्यांच्याकडेही एखादा आशेचा किरण दिसत नाही. ज्यांच्याकडून नव्या पर्यायाची आशा होती, त्यांच्याकडून तर अपेक्षा करणेच चुकीचे ठरले. एकूणच, मागील पाच वर्षांत 'अच्छे दिन'च्या दिशेने जाण्याऐवजी आपण भूतकाळातील घटनांमध्येच अडकून पडलो. समस्या सोडवण्याऐवजी त्या आणखीच वाढत गेल्या.

आज देशाचा खरा विरोधी पक्ष संसदेत नाही तर रस्त्यावर उतरला आहे. मागील चार वर्षात देशात दोन सकारात्मक शक्ती उदयास आल्या. अनेक दशकांनंतर देशभरात विखुरलेले शेतकरी एकजूट झाले. केवळ स्वत:साठी नव्हे तर संपूर्ण ग्रामीण भारताचे भविष्य वाचवण्यासाठी त्यांनी आंदोलन उभे केले. दुसरीकडे देशभरातील युवाशक्तीचा विस्फोट होत आहे. आज देशातील तरुण केवळ स्वत:साठी शिक्षण आणि रोजगाराची मागणी न करता देशाच्या नवनिर्माणात योगदान देऊ इच्छितात. शेतकरी आणि तरुण भारताच्या भविष्याची दर्शवत आहेत. सध्याच्या व्यवस्थेत उपेक्षा, भेदभाव आणि हिंसेला बळी पडलेला दलित समाज देशभर आंदोलन उभे करत आहे. महिलाविरोधी हिंसाचाराविरोधात ठिकठिकाणचे नागरिक आवाज उठवत आहेत. व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात दरदिवशी स्थानिक पातळीवर संघर्ष सुरू आहे. दुर्दैवाने त्यांनी दर्शवलेल्या दिशेने चालण्याऐवजी त्यांचा आवाज दाबण्यासाठी देशभर हिंदू-मुस्लिम दंगे भडकवण्याची तयारी सुरू आहे. यासाठी अयोध्या, काश्मीर किंवा आसामचेही कारण पुढे केले जाऊ शकते. निवडणुकीपूर्वी सीमेपार काय घडेल, याची शाश्वती कुणीही देऊ शकत नाही. कुंभमेळ्यातही एखादी दुर्घटना होऊ शकते. काहीही असो, २०१९ च्या निवडणुकांचे समीकरण स्पष्ट आहे. शेतकरी-तरुण अथवा हिंदू-मुस्लिम! ही निवडणूक शेतकरी व तरुणांच्या मुद्द्यावर लढवली गेली तर सत्तेत कुणीही आले तरी देशाची प्रगतीच होईल. पण हिंदू-मुस्लिमांचा मुद्दा पुढे करून कुणीही जिंकले तरी देशाचा पराभव निश्चित आहे!

आज देश प्रगतीसाठी सज्ज आहे. नागरिक आपापले योगदान देण्यासाठीही तयार आहेत. पण त्यांच्यासमोर एकही संधी नाही ना एकही नेतृत्व! समाज सुधारणाऱ्या संस्थांची दुकानेच झाली असून मोठे पक्ष जणू अड्डे! विचारसरण्या मेंदूतच कैद झाल्या आहेत. ही ऊर्जा एकवटून ती वापरात आणण्याचे काम कोणीही व्यक्ती अथवा संघटना करू शकत नाही. सत्तेच्या स्पर्धेतील पक्षही यासाठी काही करू शकत नाहीत. पण स्वत: खुर्चीचा मोह टाळून इतरांसाठी व्यासपीठ तयार करणारे, हे आव्हान पेलू शकतात.

याच विचारातून मागील आठवड्यात देशातील नागरिकांसमोर मी एका पत्राद्वारे एक प्रस्ताव ठेवला आहे. तो असा की, या ऐतिहासिक निवडणुकीत देशासमोर ठोस मुद्दे आणि योग्य अजेंडा ठेवण्यासाठी 'राष्ट्रनिर्मितीसाठी लोकअभियान २०१९ (इंग्रजीत iCan19)' नावाचे व्यासपीठ उभारावे. या माध्यमातून देशातील हजारो नागरिक येत्या निवडणुकीत योग्य हस्तक्षेप करू शकतील. निवडणुकीचा अजेंडा निश्चित करू शकतील. उपरोक्त समस्यांवरील उपाय शोधू शकतील, उत्कृष्ट पर्यायही निवडू शकतील. नंतर देशभरात या समस्या आणि त्यावरील उपायांचा प्रचार करू शकतील. जेणेकरून मोठ्या पक्षांनाही या गंभीर मुद्द्यांची दखल घ्यावीच लागेल. निवडणूक जवळ येताच अभियानातील नागरिक देशातील वास्तविक मुद्द्यांचे प्रतिनिधित्व करू शकणाऱ्या उमेदवारांना निवडून देऊ शकतील. तसेच देशाला योग्य अजेंडा देणाऱ्या उमेदवारांचा प्रचारही ते करू शकतील. या अभियानात सुरुवातीला स्वराज इंडियासोबत अनेक संघटना सामील होत आहेत. तसेच यात सहभागी होणारा एखादा पक्ष किंवा संघटनेशीच निगडित असावा, अशी अट नाही. निवडणुकीत विविध पक्षांची आपापली टीम असेल. पण iCan19 एक 'टीम इंडिया' उभी करेल! या पत्राला उत्तरादाखल हजारो नागरिकांनी अभियानात (ican2019swaraj@gmail.com किंवा swarajindia.org/iCAN19) सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. अनेक सामाजिक व राजकीय संघटनांचाही यात समावेश आहे. हा प्रयोग कितपत यशस्वी होईल, हे काळच ठरवेल. पण हा प्रयोग केवळ २०१९ मधील निवडणुकीलाच नव्हे तर एकूण लोकशाहीला नवी दिशा देणारा ठरू शकतो.

आज देश प्रगतीसाठी सज्ज आहे. नागरिक योगदान देण्यासाठीही तयार आहेत. पण त्यांच्यासमोर एकही संधी नाही ना नेतृत्व! ही ऊर्जा एकवटून ती वापरात आणण्याचे काम कोणीही व्यक्ती अथवा संघटना करू शकत नाही. पण स्वत: खुर्चीचा मोह टाळून इतरांसाठी व्यासपीठ तयार करणारे हे आव्हान पेलू शकतात. याच विचारातून 'राष्ट्रनिर्मितीसाठी लोकअभियान २०१९ (इंग्रजीत गॅ्हि१९)' नावाचे व्यासपीठ उभारण्याचा विचार आहे. या माध्यमातून देशातील हजारो नागरिक येत्या निवडणुकीत योग्य हस्तक्षेप करू शकतील. निवडणुकीचा अजेंडा निश्चित करू शकतील.

# प्रदूषण निर्मूलन मंडळाच्या नावे पिशव्यांची सर्रास विक्री

**मीरा रोड- मीरा-भाईंदरमध्ये सरकारची परवानगी नसताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नावाचा वापर करून सर्रास प्लास्टिक पिशव्या विकल्या जात असल्याचे मंडळाने पालिकेच्या स्वच्छता निरीक्षक व मुकादमांसह टाकलेल्या छाप्यात स्पष्ट झाले. मोठ्या प्रमाणात बेकायदा प्लास्टिक पिशव्यांचा साठा असतानाही पालिकेच्या एका अधिकाऱ्याच्या हस्तक्षेपामुळे तो साठा जप्त केला गेला नसल्याने यात पालिकेचे संगनमत असल्याच्या आरोपांना बळ मिळाले आहे.**

कारवाईत सुमारे २०० किलो प्लास्टिक जप्त करुन ५५ हजारांचा दंड वसूल केला. मीरा- भाईंदरमध्ये बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या, स्ट्रॉ, ग्लास, आदींची सर्रास विक्री व वापर होतो. महापालिका प्लास्टिक विरोधात कारवाईचा दावा करत असली तरी शहरात राजरोस पिशव्यांचा सुरू असलेल्या वापरामुळे या विक्रेत्यांना पालिकेचाच आशीर्वाद असल्याचे आरोप सातत्याने होत आहेत. एकीकडे बंदी असलेल्या पिशव्या सर्रास विकल्या व वापरल्या जात असताना दुसरीकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नाव एसएसआय व एमपीसीबी क्रमांक टाकून छापलेल्या पिशव्यांचीही विक्री सुरू आहे. या पिशव्यांवर ५० मायक्रॉनपेक्षा अधिक जाडी व पुर्नवापर योग्य असल्याचे छापले आहे. मंडळाच्या ठाणे विभागाच्या निरीक्षक सुवर्णा गायकवाड यांनी



भाईंदर पूर्व येथील पालिकेच्या आरोग्य विभागाच्या कार्यालयात पालिकेचे स्वच्छता निरीक्षक, मुकादम तसेच प्लास्टिक पिशव्यांचे घाऊक विक्रेते यांच्याशी चर्चा केली. विक्रेत्यांनी आणलेल्या पिशव्यांची त्यांनी जाडी तपासली असता त्या अवघ्या २० ते ४० मायक्रॉनच्या आढळल्या. सरकारने कुणालाही पिशव्या छापण्यास परवानगी दिली नसल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले. त्यानंतर गायकवाड यांच्यासह स्वच्छता निरीक्षक, मुकादम यांच्यासह भाईंदर पूर्वेला स्टेशन समोरील मार्केटमध्ये असलेल्या घाऊक विक्रेत्यांच्या दुकानांवर कारवाईला सुरूवात केली. बंदी असलेल्या विविध प्रकारच्या पिशव्या, ग्लास, प्लेट, स्ट्रॉ, थर्माकोल आदी साठा सापडला. आशिष पॅकेजिंग, संभव प्लास्टिक, अरिहंत ट्रेडर्स, नवनिदान आदी घाऊक विक्रेत्यांच्या दुकानांवर कारवाई केली.

# 'बुलेट ट्रेन'ला पालिकेचा विरोध

**वसई-** वसई-विरार शहरातून जाणाऱ्या बुलेट ट्रेनला महापालिकेने विरोध केला आहे. बुलेट ट्रेनसाठी महापालिकेकडे संरेखन करण्याचा प्रस्ताव आणि विकास हस्तांतर देण्याचा प्रस्ताव पालिकेने फेटाळून लावला आहे. बुलेट ट्रेनचा वसई-विरार शहराला उपयोग नाही, त्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त होणार असल्याची भूमिका सत्ताधारी बहुजन विकास आघाडीने घेऊन हे प्रस्ताव फेटाळले.



मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन वसई-विरार शहराच्या पूर्व भागातील गास, कोपरी, शिरगाव, चंदनसार, भाटपाडा, विरार, मोरे, गोखिवरे, बिलालपाडा, राजिवली, टिवरी, चंद्रपाडा, बापाणे, कामण, ससून नवघर या गावांतून जाणार आहे. यातील बहुतांश गावे हरितपट्ट्यातील आहेत. त्यामुळे गावातील शेतकरी या बुलेट ट्रेनमुळे बाधित होणार आहेत. या प्रकल्पांच्या संरेखनाची रुंदी १७.५ मीटर एवढी मोठी आहे. महापालिकेने यासाठी आपल्या विकास आराखड्यात बुलेट ट्रेनसाठी संरेखने टाकावीत तसेच जे प्रकल्पबाधित होतील त्या जमीनमालकांना हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) द्यावे, अशा मागणीचा प्रस्ताव राष्ट्रीय हायस्पीड रेल्वे निगम लिमिटेड या कंपनीने महापालिकेपुढे ठेवला होता. हे दोन्ही प्रस्ताव महासभेत मंजुरीसाठी आले असता त्याला सत्ताधारी पक्षाने जोरादार विरोध केला. महापालिकेचे हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) धोरण नाही. पालिका केवळ ०.३३ टक्के हस्तांतरणीय विकास हक्क देते. मग हरित पट्टा उद्ध्वस्त करायचा का असा सवाल माजी उपमहापौर आणि बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ नगरसेवक उमेश नाईक यांनी केला. बुलेट ट्रेनचाचा नालासोपारा, वसईतील लोकांना फायदा नाही, असेही त्यांनी सांगितले. पालिका शासनाकडे अनेक जनतेच्या प्रकल्पांसाठी हस्तांतरणीय विकास हक्क मागत असते. तेव्हा शासन ते मंजूर करत नाही, मग आता शासनाला गरज आहे, तेव्हा आमच्याकडून ते काम घाईघाईने मंजूर करवून घेत आहे, असा सवाल करत जोरदार विरोध केला. सर्वच नगरसेवकांनी या प्रस्तावाला विरोध केला. मात्र भाजपाचे नगरसेवक किरण भोईर यांनी मात्र त्याचे समर्थन केले.

राज्य शासनाचा प्रस्ताव असल्याने मी बाजू मांडत असल्याचे आयुक्त सतीश लोखंडे यांनी सांगितले. विकास आराखड्यात केवळ संरेखांकने करावी यासाठी हा प्रस्ताव होता, असे ते म्हणाले.

# ठाणे स्थानकाला दुचाकीचा विळखा

**ठाणे-** वाहनकोंडी आणि फेरीवाल्यांच्या अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना नकोशा झालेल्या ठाणे रेल्वे स्थानक परिसरात बेकायदा पद्धतीने दुचाकी उभ्या केल्या जात आहेत. पोलीस व काही राजकीय पक्षांचे निशाण या वाहनांवर चिकटवून हे अतिक्रमण सुरू आहे. रेल्वे स्थानक परिसरातील वाहतुकीला शिस्त लागावी यासाठी पोलीस आणि महापालिकेच्या पुढाकाराने रस्त्याच्या दुतर्फा वाहने



उभी करण्यासाठी ठरावीक वेळा ठरवून देण्यात आल्या होत्या. या नियमाची अंमलबजावणी व्हावी यासाठी महापालिकेकडून स्थानक परिसर, गावदेवी या भागात वाहनतळ उभारण्यात आले. तरीही रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी केली जात आहेत. गेल्या काही दिवसांपासून या प्रकारांमध्ये वाढ झाली असून या भागात कोणाचेही नियंत्रण राहिले नसल्याचे चित्र आहे. जुन्या वाहतूक शाखेच्या ठिकाणी नागरिक सकाळपासून दुचाकी उभी करून निघून जातात.

# अनधिकृत इमारतींनाही नळजोडणी

**वसई-** वसई-विरार शहरातील अनधिकृत इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना नळजोडण्या देण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या महासभेत एकमताने मंजूर करण्यात आला. यामुळे हजारो इमारतींच्या रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. वसई-विरार शहर झपाट्याने वाढत असून शहरात भूमाफिया आणि विकासकांनी शेकडो अनधिकृत इमारती बांधल्या आहेत. बनावट बांधकाम परवागनी वापरून, आरक्षित जागेवर अतिक्रमण करून, परवानगी न घेता बहुमजली इमारती बांधल्या आहेत. या सर्व अनधिकृत इमारती असल्याचे महापालिकेने जाहीर केले होते. खोटी कागदपत्रे दाखवून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केली जाते आणि बांधकाम व्यावसायिक फरार होतात. महापालिकेने शेकडो बांधकाम व्यावसायिक आणि भूमाफियांवर गुन्हे दाखल केले आहेत. परंतु त्यांनी यापूर्वीच घरे विकल्याने लोक या इमारतीत राहायला आली आहेत. त्यांच्यापुढे पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला होता. शहरात सूर्याच्या दुसऱ्या दुसऱ्या टप्प्यातील शंभर दशलक्ष लिटर पाणी शहरात आले आहे. सध्या महापालिकेने प्रतीक्षा यादीतील अधिकृत आणि भोगवटा प्रमाणपत्र मिळालेल्या इमारतींनाच नवीन नळजोडण्या देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शहरातील अनधिकृत इमारतीत आणि चाळीत राहणाऱ्या नागरिकांपुढे मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्यांना टँकरच्या पाण्यावर अलवंबून राहावे लागत होते. आता सूर्याच्या पाण्याच्या वितरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे या अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांनाही पाणी द्यावे, अशी मागणी करण्यात येत होती. परंतु आयुक्तांनी अधिकृत इमारतींनाच नळजोडण्या देण्याला प्राधान्य दिले. अनधिकृत इमारतींपैकी काही इमारतींना घरपट्टी लावण्यात आलेली आहे. मात्र नळजोडण्या



नाहीत. या इमारतीच्या रहिवाशांची नावे मतदार यादीत आहेत. परंतु त्यांना पाणी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली.

महापालिकेच्या बुधवारी झालेल्या महासेभत अखेर नळजोडण्या देण्याचा विषय चर्चेत आला. अनधिकृत इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांना शास्ती न लावता प्रचलित दराने नळजोडण्या देण्यात याव्या, अशी मागणी सभापती निलेश देशमुख यांनी केली.

# वसई खाडीतील रो रो सेवा नायगावपर्यंत?

**वसई-** ठाण्याहून वसई खाडीपर्यंत सुरू होणारी रो रो सेवा नायगाव खाडीपर्यंत नेण्याचा प्रस्ताव वसई विरार महापालिकेने केंद्रीय जलवाहतूक खात्याकडे ठेवला आहे. नायगाव खाडीचे रुंदीकरण करून ही सेवा सुरू केल्यास या पट्ट्यातील अनेक गावांना त्याचा फायदा होणार आहे. महामार्गावरून वाहतुकीसाठी लागणारा विलंब, वाहतूक कोंडी, इंधनाचा अपव्यय या गोष्टी टाळण्यासाठी जलमार्गे मालवाहतूक अर्थात रो रो वाहतुकीचा पर्याय पुढे आला आहे. ठाणे खाडीतून भाईंदर आणि वसई येथील रो रो सेवेला मंजुरी देण्यात आलेली आहे. ही सेवा वसईपर्यंत न ठेवता नायगाव खाडीपर्यंत नेण्याचा प्रस्ताव महापालिकेने ठेवला आहे. याचा फायदा नायगाव, जुचंद्र, मालजीपाडा, राजावली, टिवरी, ठाणे, कल्याण अशा गावांतील नागरिकांना होऊ शकेल.

सध्या वसई खाडी ही २१ मीटर रुंद आहे. मात्र या खाडीची रुंदी ४० मीटपर्यंत वाढवण्यात आल्यास या ठिकाणी ही सेवा सुरू करता येईल, असे या प्रस्तावात म्हटले आहे. महापालिकेच्या शिष्टमंडळाने यासाठी केंद्रीय जलवाहतूक आणि रस्ते व बांधकाममंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. याबाबत बोलताना माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले की, या सेवेमुळे वसई पूर्वेकडील अनेक गावांना फायदा होईल आणि व्यवसाय वृद्धिंगत होऊ शकणार आहे. महापालिकेच्या या प्रस्तावाला केंद्रीय मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मानकर यांनी सांगितले. रो रो सेवा म्हणजे रेल्वेच्या मालगाडीतून जशी मालवाहतूक के ली जाते, त्याचप्रमाणे जल मार्गानेही




मालवाहतूक गाड्या आणि इतर गाड्या वाहून नेणे, प्रवासी वाहतूक या सर्व गोष्टी आता जलमार्गाने सुरू होणार आहेत. जल मार्गाने होणारा प्रवास हा पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त असा प्रवास आहे.

## थोडक्यात

### आरक्षण देऊन भाजपने राजकीय स्वार्थ साधला -प्रकाश आंबेडकर

**मुंबई-** निवडणुकीच्या तोंडावर भाजपने मराठा समाजाला आरक्षण देऊन आपला राजकीय स्वार्थ साधला आहे. मराठा व ओबीसी समाजात भांडणे लागली आहे, संघर्ष निर्माण होणार आहे, असे मत बहुचन वंचित आघाडीचे नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले अहमदनगरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'मातंग समाज सत्ता संपादन एल्गार परिषदे'त अॅड. आंबेडकर बोलत होते. मंडल आयोगाने ज्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारावर ओबीसींना आरक्षण दिले, तेच मराठा समाजाला लागू केले आहे. यामुळे ओबीसींमध्ये आमच्या ताटात वाटेकरी निर्माण झाल्याची, भीतीची भावना निर्माण झाली आहे. त्यातून शांत असलेला महाराष्ट्र आता संघर्षांच्या उंबरठ्यावर उभा राहिलेला दिसेल, आरक्षणातून निर्माण झालेली ही कटुता निवडणुकीतून बाहेर पडलेली दिसेल, असेही त्यांनी सांगितले.



### पेट्रोल होईल ३४ रुपये लीटर

**नवी दिल्ली-** 'वितरकांचे कमिशन आणि सर्व कर वगळले तर, राजधानी दिल्लीत पेट्रोलची किंमत ३४.०४ रुपये प्रती लिटर आणि डिझेलची किंमत ३८.६७ रुपये प्रती लिटर होऊ शकते,' अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री शिवप्रताप शुक्ला यांनी दिली आहे. इंधनांच्या दरांबाबत १९ डिसेंबरला विचारलेल्या लेखी प्रश्नाला उत्तर देताना शुक्ला यांनी लोकसभेत ही माहिती दिली. ते म्हणाले, 'पेट्रोलच्या दरात कर आणि वितरकांचे कमिशन याचा हिस्सा एकूण दराच्या ९६.९ टक्के असतो. तर, डिझेलमध्ये तो ६०.३ टक्के असतो. त्यामुळे मूळ दरात वाढ होते.' १९ डिसेंबर रोजी पेट्रोलचा किरकोळ दर ७०.६३ रु. होता. यामध्ये केंद्रीय उत्पादन शुल्क १७.९८ रु., राज्याचा 'व्हॅट' १५.०२ रु. आणि वितरकांचे कमिशन ३.५९ रु. होते,' असेही त्यांनी सांगितले.




### अनैतिक संबंधास विरोध; प्रेयसीच्या मदतीने केली पत्नीची हत्या

अनैतिक संबंधास विरोध केल्याने पतीने त्याच्या प्रेयसीच्या मदतीने पत्नीचा गळा दाबून खून केल्याची घटना राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथे घडली. याप्रकरणी लोणी पोलिसांनी मयतचा पती व प्रेयसी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. लोणी खुर्द येथे विश्वास रंगनाथ गायकवाड हा त्याची पत्नी कल्पनासह वय ४० राहतो. विश्वासचे एका मुलीशी अनैतिक संबंध होते. ही बाब कल्पनाला समजली होती. तिने पतीच्या संबंधांना विरोध दर्शवला. तसेच त्याची समजूत काढण्याचा प्रय़त्नही केला. पण विश्वासला पत्नीचा काटा काढायचा होता. अखेरीस घरात कोणीही नसताना विश्वासने कल्पनाची गळा दाबून खून केला. शवविच्छेदनात ही बाब उघड झाल्यानंतर लोणी पोलिसांनी विश्वास रंगनाथ गायकवाड व प्रेयसी प्रमिला ऊर्फ शहाबाई या दोघांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी विश्वासला अटक केली आहे.



### उद्धव ठाकरे नव्या वर्षात 'मातोश्री २'मध्ये शिफ्ट होणार

**मुंबई -** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे नव्या वर्षात 'मातोश्री २'या नव्या इमारतीमध्ये शिफ्ट होणार आहे. वांद्रे कलानगर येथील या निवासस्थानासमोरच आठ मजली 'मातोश्री २' इमारत तयार झाली आहे. ठाकरे कुटुंबीय सध्या 'मातोश्री' या १० हजार स्क्वेअर फूट जागेवरील निवासस्थानी राहतात. नव्या इमारतीची जागा २०१६ मध्ये ११ कोटी ६० लाख रुपयांमध्ये खरेदी करण्यात आली होती. सुरुवातीला या इमारतीला सहा मजल्यांचीच परवानगी होती, पण नंतर आणखी दोन मजल्यांची परवानगी देण्यात आली. आठ मजल्यांच्या 'मातोश्री' २ इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर तीन ड्युप्लेक्स फ्ॅट आणि पाच बेडरुम आहेत. स्टडी रुम, स्विमिंग पूल, हॉल अशा अनेक सुविधा यामध्ये असतील. प्रत्येक मजल्यावर ठाकरे कुटुंबातील एक व्यक्ती राहणार असल्याचं बोललं जातं.



# नववर्षाच्या तोंडावर सामान्यांना दिलासा, ३३ वस्तूंवरील जीएसटी कमी

**नवी दिल्ली : जीएसटीमुळे हैराण झालेल्यांसाठी एक खुशखबर आहे. येणाऱ्या काळात सर्व वस्तूंवर समान कर आकारला जाण्याची शक्यता आहे. म्हणजेच सर्वच वस्तूंसाठी जीएसटीची एकच श्रेणी असेल, असे संकेत केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी दिले आहेत. याबरोबरच जीएसटीमधील २८ टक्क्यांचा स्लॅब लवकरच काढून टाकण्यात येईल, अशीही महत्त्वपूर्ण माहिती जेटली यांनी दिली आहे.**




"जीएसटीचे अठरा महिने" या मथळ्याखाली जेटली यांनी फेसबूकवर एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये त्यांनी जीएसटीत घट करण्यात येण्याबाबतची माहिती दिली आहे.

जेटली यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, सध्या जीएसटीचे चार टप्पे आहेत. यातील १२ आणि १८ टक्के या टप्प्यांमध्ये सुवर्णमध्य काढला जाईल. ५%, १२%, १८% आणि २८% अशा चार टप्प्यांमध्ये जीएसटीची आकारणी होते. यापैकी १२% आणि १८% यांच्यात सुवर्णमध्य साधला जाईल.

जीएसटीमधून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झाली तरच हा सुवर्णमध्य काढला जाईल, असे स्पष्टीकरणही जेटली यांनी दिले आहे. 'लवकरच देशात जीएसटी फक्त तीन टप्प्यांमध्ये आकारला जाईल. शून्य, ५% आणि उच्च प्रतीच्या वस्तूंसाठी आणखी एक टप्पा, अशा तीन टप्प्यांमध्ये जीएसटी आकारण्यात येईल, असेही जेटली यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

सध्या वापरल्या जाणाऱ्या एक हजार २१६ वस्तूंपैकी, १८३ वस्तूंवर शून्य रुपये, ३०८ वस्तूंवर ५ टक्के, १७८ वस्तूंर १२ टक्के आणि ५१७ वस्तूंवर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल अशी माहिती जेटली यांनी दिली आहे. सध्या सक्झरी आणि माहगड्या वस्तूंवर २८ टक्के जीएसटी आकरला जातो. त्यात ऑटो पार्ट्स, एअर कंडिशनर्स (एसी) आणि सिमेंटसह २८ वस्तूंच्या विक्रीत २८ टक्के वाढ झाल्याचे जेटली यांनी म्हटले आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यावेळी हेलिपॅडवर शेळया मेंढ्या सोडणार -जानकर

***विटा- धनगर समाजाच्या आरक्षणप्रश्नी राज्य सरकार दिरंगाई करीत आहे. त्याविरोधात धनगर समाज आक्रमक झाला असून नागज कवठे महंकाळ येथे मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यात हेलिपॅडवर शेळ्या मेंढ्या सोडण्याचा इशारा धनगर समाजाचे नेते आणि टायगर ग्रुपचे जिल्हा संघटक राजू जानकर यांनी दिला आहे.***

याबाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात जानकर यांनी, धनगर समाजाला पहिल्या कॅबिनेटमध्ये एसटी प्रवर्गाचे आरक्षण देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. मात्र चार वर्षे उलटून गेली तरी अद्याप त्या संदर्भात कार्यवाही झालेली नाही. धनगर समाजाला आरक्षणापासून वंचित ठेवण्याचा कुटील डाव भाजप सरकारने रचला आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी धनगर समाजाला आरक्षण देतो,



असे भाजपने सांगितले होते. मात्र त्यांना आता या घोषणेचा विसर पडला आहे, यामुळे महाराष्ट्रातील धनगर समाजाची घोर फसवणूक झाली आहे. असे म्हटले आहे.

यावेळी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी, आधी धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे प्रमाणपत्र द्यावे आणि मगच यावे अन्यथा फसव्या भाजपसरकार आणि मुख्यमंत्र्यांच्या विरोधात बंड पूकारू. मुख्यमंत्र्याच्या नियोजित दौऱ्यासाठी तयार करण्यात आलेल्या हेलिपॅडच्या ठिकाणी शेळ्या-मेंढ्या सोडू अया इशारा देण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्र्याच्या नियोजित दौऱ्यावेळी गनिमीकाव्याने लेंडीफेक आंदोलन करणार. असेही या निवेदनात जानकर यांनी म्हटले आहे.

## मुंबई पोलीसांनी नाकारली 'भीम आर्मी'च्या सभेला परवानगी

**मुंबई-** मुंबईतील 'भीम आर्मी'चे प्रमुख चंद्रशेखर आझाद उर्फ रावण यांच्या कार्यक्रमाला पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. मुंबई पोलिसांवर भेदभाव करुन आवाज दडपल्याचा आरोप भीम आर्मीच्या मुंबईतील नेत्यांनी केला आहे.



शिवप्रतिष्ठानचे नेते संभाजी भिडे यांच्या मुंबईतील कार्यक्रमास आमच्या संघटनेने विरोध केल्यामुळे पोलिस जाणीवपूर्वक आम्हाला परवानगी देत नसल्याचा दावा भीम आर्मीने केला आहे. वरळीतील जांबोरी मैदानात तसेच दादरच्या चैत्यभूमी परिसरात भीम आर्मीने कार्यक्रमाच्या आयोजनाची परवानगी मागितली होती.

चंद्रशेखर आझाद यांच्या कार्यक्रमामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कारण वरळी पोलिसांनी देऊन परवानगी नाकारली. तर सुट्टीचा दिवस असल्याने अनुयायांची गर्दी होत असल्याने तिथेही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न होत असल्याचे दादर पोलिसांनी सांगून परवानगी देण्यास नकार दिला आहे.

## 'मुख्यमंत्रीपदावर राहण्यासाठी मनोहर पर्रिकर मोदींना ब्लॅकमेल करतायत'

**पणजी:** मनोहर पर्रिकर यांच्याकडे राफेल कराराबाबतची महत्त्वपूर्ण माहिती असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांना गोव्याच्या मुख्यमंत्रिपदावरून दूर सारण्याचे धाडस करू शकत नाहीत, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते जयपाल रेड्डी यांनी केला. ते शुक्रवारी एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी रेड्डी यांनी म्हटले की, भाजपकडून नैतिकतेच्या गप्पा मारल्या जातात. मात्र, मनोहर पर्रिकरांच्यावेळी भाजपची ही नैतिकता कुठे जाते? पर्रिकर हे एखाद्या जळवेसारखं मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीला चिकटून बसलेत. मला याचे कारण माहिती आहे. भारताने फ्रान्सशी राफेल करार केला तेव्हा मनोहर पर्रिकर संरक्षणमंत्री होते. त्यामुळे त्यांच्याकडे या कराराबाबतची महत्त्वपूर्ण माहिती आहे. याचीच भीती दाखवून पर्रिकरांनी आपले मुख्यमंत्रीपद शाबूत ठेवलेय. मोदी त्यांना काहीही करु शकत नाहीत, असे रेड्डी यांनी म्हटले. रेड्डी यांच्या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

पर्रिकर गेल्या काही महिन्यांपासून स्वादुपिंडाच्या कर्करोगाशी झुंज देत आहेत. यामुळे त्यांची प्रकृती कमालीची खालावली आहे. मात्र, असे असूनही भाजपने त्यांना मुख्यमंत्रीपदी कायम ठेवले आहे. गंभीर आजारी स्थितीतही



पर्रिकर यांना काम करायला लावून त्याची जाहिरात केल्याबद्दल भाजपवर बरीच टीका होत आहे.

काही दिवसांपूर्वीच त्यांच्या एका दौऱ्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. नाकात नळी असूनही पर्रिकर जुवारी आणि मांडवी उड्डाणपूल प्रकल्पाच्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी आले होते. यासाठी त्यांनी पर्वरी ते मेर्सिस असा सहा किलोमीटरच प्रवासही केला.

## कांदिवलीतील आगीत ४ जणांचा मृत्यू

**मुंबई -** अंधेरीतील कामगार रुग्णालयातील आगीची घटना ताजी असतानाच कांदिवलीतील आगीत चौघांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी सकाळी घटनास्थळी पाहणी केल्यानंतर चौघे जण होरपळल्याचं आढळून आलं. कांदिवलीतील शताब्दी हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यावर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.



कांदिवली पूर्वेकडील दामू नगरमधील कपड्याच्या कारखान्याला रविवारी दुपारी ही आग लागली होती. आग लागताच कामगार बाहेर पळाले. यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी ही आग दीड तासानंतर आटोक्यात आणली. या आगीत कोणीही जखमी किंवा कुठलीही जीविहानी झाली नसल्याचं सांगण्यात आलं होतं. पण सोमवारी सकाळी अग्निशमन दलाच्या जवानांनी शोध मोहीम सुरू केल्यानंतर १० तासांनी ढिगाऱ्याखाली चौघांचे मृतदेह आढळून आले. यामुळे अग्निशमन दलाने घटनास्थळाची आणखी बारकाईने तपासणी केली. आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र वेल्डिंगचं काम सुरू असल्याने ही आग लागल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. पण अग्निशमन दलाच्या अहवालानंतरच या आगीचं कारण स्पष्ट होणार आहे.

## देशात मोदींनी आणीबाणी जाहीर करावी -शिवसेना

**नवी दिल्ली-** देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी औपचारिक आणीबाणी लागू करावी, असे शिवसेनेच्या प्रवक्त्या मनिषा कायंदे यांनी म्हटले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने देशाच्या सुरक्षेचा मुद्दा समोर करत कोणत्याही व्यक्तीचा मोबाईल, कॉम्प्युटर आणि लॅपटॉपमधील डेटा तपासण्याचे अधिकार काही तपास यंत्रणांना दिले आहेत. कायंदे यांनी त्यावर पत्रकारांसमोर केंद्र सरकारला धारेवर धरले. सरकारच्या या धोरणाचा विरोध देशभरात केला जात आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यापाठोपाठ मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेनेही केंद्रातील मोदी सरकारला धारेवर धरले आहे. देशातील जनतेवर पाळत ठेवण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असल्याचा सूर राजकीय पक्षांनी आवळला आहे. जनतेच्या गोपनियतेवर कोणतीही पूर्वसूचना न देता केंद्र सरकार पाळत ठेवत असल्यामुळे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. मोदींनी केवळ औपचारिकरित्या देशात आणीबाणीच घोषित करावी, अशा शब्दांत कायंदे यांनी केंद्र सरकावर टीका केली आहे.

पृष्ठ १ वरुन

## साने गुरुजी विद्यामंदिर सांताक्रूझ येथे शिक्षक कृतज़ता दिन साजरा









सास्कृंतिक , शैक्षणिक विभागात लोकप्रिय असलेले शाहीर दत्ताराम म्हात्रे, मिलिंद जोगळेकर व यशवंत पाटील यांचाही सत्कार आश्रय ट्रस्टच्या संस्थापक , सचिव सौ. प्रिती नाईक यांनी केला.

या शाळेसाठी शाहीर लिलाधर हेगडे यांचे खुप मोठे योगदान आहे. यांनी आपले सर्व आयुष्य संपूर्ण वेळ या शाळेसाठी दिला म्हणून आज ही शाळा व्यवस्थित उभी आहे . आजुबाजूच्या संपूर्ण परिसरातील सर्व मुलांनी या शाळेत शिक्षण घेतले आहे. त्यावेळी मराठी विभाग असे काही नव्हते शाळेत दहावीपर्यंत मराठी शिकून पूढे उच्च शिक्षण घेउन ही मुले फार मोठी झाली आहेत पण आता प्रत्येकाचे विचार इंग्रजी माध्यम असल्यामूळे शाळेतील मुलांची पटसंख्या कमी होत चालली आहे. अशी खंत श्रीमती मळेकर बाई यांनी व्यक्त केली. ज्या विदयार्थ्यांची आर्थिक स्थिती शिकण्यासाठी योग्य नसेल अश्या विदयार्थ्यांचे शिक्षण अनेक शिक्षकांनी आपल्या हिस्यांतून भरुन त्यांचे शिक्षण पूर्ण करुन दिले आहे.

अशा या शिक्षक कृतज्ञता दिनाचा सोहळा अतिशय आनंदाने पार पडला. या कामी माजी विदयार्थी ,विदयार्थीनी यांनी मोठया संख्येने भाग घेतला.

## अमेरिकेत तिसऱ्यांदा शटडाऊन; ८ लाख कर्मचारी बिनपगारी

**वॉशिंग्टन-** अमेरिकेच्या सीमेवरती भिंत बांधण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सादर केलेल्या आर्थिक खर्चाच्या विधेयकाला काँग्रेस खासदारांनी विरोध केल्याने नाताळापूर्वीच अमेरिका सरकारचे शटडाऊन झाले आहे. यामुळे शनिवारी १२ वाजल्यापासून शासकीय आर्थिक कामकाज अशतः ठप्प झाले आहे. याचा सर्वाधिक फटका ८ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना बसणार आहे. त्यांना विनावेतन काम करावे लागणार आहे.

अमेरिका आणि मेक्सिको सीमे दरम्यान भिंत बांधण्यासाठी ट्रम्प यांनी ५ अब्ज डॉलरची मागणी केली होती. त्याला डेमोक्रॅटसने जोरदार विरोध केला. या आर्थिक खर्चाला मंजुरी मिळाली नसल्याने शटडाऊन झाले आहे. यंदाच्या वर्षातील हे तिसरे शटडाऊन आहे. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटीव्हचे कामकाज शुक्रवारी तहकूब झाले. तर सिनेटचे कामकाजही थांबले आहे. मात्र, शटडाऊन टाळण्यासाठी कोणत्याही हालचाली झाल्या नाहीत. सध्याच्या परिस्थितीत राजकीय विरोधक कारणीभूत असल्याचा आरोप डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. मात्र, आम्ही दीर्घकाळ चालणाऱ्या शटडाऊनसाठीही तयार असल्याचे आव्हान त्यांनी दिले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)